	M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,Mumbai Divisional Board,Vashi, Navi Mumbai-४०० ७०३.		**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.**

क्र. मुंविमं/यो.प्र./ 3960
वाशी ,नवी मुंबई ४००७०३
दिनांक: 90/06/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक /प्राचार्य,
या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय /अशासकीय अनुदानीत /
खाजगी विनाअनुदानित संस्था .

विषय:- योग्यता प्रमाणपत्र /समकक्षता संदर्भातील सर्व प्रकारचे कार्यालयीन पत्र व्यवहार मराठी भाषेत सादर करणे बाबत
संदर्भ:- महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग मुंबई यांचे शासन निर्णय क्र- भासस -२०१८ प्र.क्र.५०/ भाषा -१ दि.१४/०३/२०२४ रोजीचा शासन निर्णय .

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णया नुसार आपणास सूचित करण्यात येत आहे की, दि.१४/०३/२०२४ रोजी पासून कार्यालयीन पत्रव्यवहार करताना मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य करण्यात आलेला आहे.

तथापि असे निदर्शनास आले आहे की काही शासकीय /अशासकीय अनुदानीत /खाजगी विनाअनुदानित संस्था योग्यता प्रमाणपत्र/ समकक्षता प्रकरणाबाबतचे प्रस्ताव, खुलासे व अन्य कार्यालयीन पत्रव्यवहार इंग्रजी / हिंदी भाषेत सादर करीत आहेत.

त्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्यभाषा अधिनियम,१९६४ तसेच वरील शासन निर्णयानुसार योग्यता प्रमाणपत्र/ समकक्षता प्रकरणाशी संबधित सर्व प्रस्ताव, खुलासे,तसेच सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार व सलग्न कागदपत्रे यापुढे मराठी भाषेतच सादर करण्यात यावीत, याची सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे –पवार)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यामिक
शिक्षण मंडळ,मुंबई विभागीय मंडळ
वाशी,नवी मुंबई ४००७०३